Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / Bimonthly / January- February 2025 / VOL -01 ISSUE-IV

25

# दलित आत्मकथनातील 'स्त्रीप्रतिमा'

**प्रा.डॉ. शारदा वामन मोरे**
(सहयोगी प्राध्यापिका व मराठी विभाग प्रमुख)
गंगामाई एज्युकेशन ट्रस्टचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नगांव, ता.जि.धुळे

---

1960 नंतर दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य, मार्क्सवादी साहित्य इत्यादी सहित्यप्रवाह निर्माण झालेले दिसतात. या प्रवाहाच्या निर्मितीमागे काही वर्षांचा सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय इतिहास तेवढाच परिणामकारक आहे. सूक्ष्मपणे अवलोकन केल्यास या साहित्य निर्मितीचे प्रयोजन हे परिवर्तन असल्याचेच सूचित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्म सोडून मूळचा बौध्द धम्माचा स्वीकार केला. 1956 साली नागपूर येथे दीक्षाभूमीवरील हा ऐतिहासिक सोहळ्याने पिढ्यानपिढ्याच्या गुलामगिरीतून दलितांना बाबासाहेबांनी मुक्त केले याच काळात स्वतंत्र महाराष्ट्र राज्याच्या मागणीसाठी सुरु असलेले आंदोलन 1960 पर्यंत सुरु होते. या सगळ्या घटनांचा मराठीच नव्हे तर सगळ्या समाजघटकांवर प्रचंड परिणाम घडून आला आणि साहित्यवादात त्याचे पडसाद उमटलेले दिसते. अर्थातच यामुळे खेड्यापाड्यापर्यंत परिणाम करणाऱ्या या घटनांचा फायदाच झालेला दिसतो. कारण शेकडो वर्षे अन्याय, अत्याचार, सहन करीत असलेला वंचित समाज राज्यघटनेच्या माध्यमातून शिकू लागला. त्यांच्यासाठी शैक्षणिक क्षेत्राची दारे उघडली गेली. साठोत्तरीत पोहोचलेली पिढी शिक्षित झाली. सज्ञानी व्हायला लागली शतकानुशतके कोंडून ठेवलेला श्वास उद्गार होऊन अक्षरांअक्षरांतुन आत्मकथनांच्या माध्यमातून बाहेर पडू लागला. डॉ. आंबेडकरांच्या क्रांतिकारी चळवळीने दिसून गेलेले पददलित त्यांच्या चळवळीच्या काळातच त्यांचे प्रेरणास्थान झाले.

दलित साहित्यातील 'आत्मकथन' हा प्रकार परिवर्तनाच्या लाटेतून उदयास आलेला दिसतो. आणि म्हणूनच ते माणसाच्या जगण्याशी बांधिलकी मानणारे आहे. अनेक समस्यांना हे साहित्य सामोरे जाते. अर्थात दलित साहित्याला फुले-आंबेडकरांचे वैचारिक अधिष्ठान आहे. त्यातील मी हा कधी काव्यातून, कधी कथेतून तर कधी स्वकथनातून वा वैचारिकतेतून अभिव्यक्त होतो. दलित आत्मकथनांसंदर्भात डॉ. यशवंत मनोहर यांनी स्पष्टीकरण केले आहे, ते म्हणतात, "येथील संस्कृतीने आत्मा या विचाराद्वारे जगात कुठेही नसलेला शोषणाचा एक विलक्षण आकृतीबंध, विषमतेचा विषारी विचारव्यूह साकार केला आहे. आंबेडकर समाजाच्या शोषणाची, केंद्रवर्ती आधारशिला असलेला 'आत्मा' हा शब्द त्यांच्या स्वकथनांवर लावणे हे त्यांच्या नास्तिक प्रेरणेला गुलालबुक्का लावण्यासारखे आहे. त्यामुळेच आंबेडकरवाद्यांच्या या आत्मकथनपर लेखनाला स्वकथन किंवा जीवनवृत्त म्हणजेच उचित होईल."[1] डॉ. मनोहर यांच्या विधानातून आंबेडकरवादी साहित्याचे मते विचारांशी, तत्त्वाशी कसे जुळले आहे, याची मुळ भूमिका प्रस्तुत विधानाच्या माध्यमातून सूचित होते.

साठोत्तरीनंतर 'बलुतं' 'आठवणींचे पक्षी', 'मुक्काम पोष्ट देवाचे गोठणे', 'उपरा', 'काट्यावरची पोटं', 'अंत:स्फोट', 'फांजर', 'गबाळ', 'मिटलेली कवाडे', 'माझ्या जन्माची चित्तरकथा', 'जिणं आमुचं' या आत्मकथनात दया पवार, प्र. ई. सोनकांबळे, माधव कोंडविलकर, लक्ष्मण माने, उत्तम बंडू तूपे, कुमुद पावडे, दादासाहेब मोरे, मुक्ता सर्वगौड, शांताबाई कांबळे, बेबी कांबळे इत्यादी आत्मकथनकारांनी आपल्या आत्मकथनांतून आपले विखारी अनुभव तटस्थपणे कथन केले आहेत. माणसामाणसातील केलेली दुही ही अमानुष वागणूक येणाऱ्या पिढ्यांना माहीत होऊन त्याचा प्रतिकार करून माणसाचे आयुष्य सुंदर व्हावे या हेतुने लिहिलेली ही आत्मकथने आहेत.

दलिल आत्मकथनाच्या संदर्भात डॉ. आरती कुळकर्णी म्हणतात "डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणेमुळेच दलित समाजाचे आत्मकथन जागृत झाले व प्रस्थापित चातुवर्ण्य व्यवस्थेसमोर त्यांचे अन्याय निर्भिडपणे मांडण्याची हिंमत दलित स्थकथनकारांना आली. तत्पुर्वी हा समाज स्वत:चे दु:ख आणि यातना मन मारुन गिळत होते."[2] हा मूक समाज डॉ. आंबेडकरांच्याच प्रेरणेमुळे बोलू लागला. डॉ. कुळकर्णी यांच्या विधानातून दलित साहित्याचे, दलित आत्मकथनांचे प्रेरणास्थान डॉ. बाबासाहेबांचे मानवतावादी विचार हेच आहे असे अधोरेखित करतात.

गावकुसाबाहेर उपेक्षित जीवन जगणाऱ्या शूद्र, दलित समाजातील स्त्रीचे जगणे किती विदारक व भयानक होते आणि त्यातूनही मार्ग काढणारी दलित स्त्री आत्मकथनांमध्ये प्रखरपणे प्रकटलेली दिसते स्त्रीच्या वाट्याला येणारे दु:ख अटल भोग, त्यातही दलित स्त्रीच्या वाट्याला येणारे दुहेरी शोषण, उपेक्षा, अपमान, अत्याचार आत्मकथनकारांनी आविष्कृत केले आहे. साठोत्तरी काळखंडातील आत्मकथने आणि नव्वदोत्तरी आत्मकथनातून स्त्रीप्रतिमा कशाप्रकारे साकार केल्या आहेत त्याचा शोध घेणे महत्त्वाचे आहे. लक्ष्मण माने यांच्या उपरा मधील स्त्रीजीवन म्हणजे जीवघेणा प्रकार आहे. नाल असलेल्या चप्पलचा मार खाणारी स्त्री पाशवी अत्याचारामुळे मनोरुग्ण होणारी मामाची

©Copyright 2024 *ADRJ*. All Rights Reserved

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / Bimonthly / January- February 2025 / VOL -01 ISSUE-IV

बायको भारती या आत्मकथनामधील स्त्री, सदैव हाल अपेष्टा, दु:ख वेदना यांनी भरलेली दिसते, 'उचल्या' मध्ये आई-बहिणीची अब्रु लुटली जाते व त्यांचा हुंकार समाजाच्या कानावरही पडत नाही. 'गबाळ' मध्ये गंगुबाई भूतबाधांवर इलाज करते, तिच्या अंगात अंबामाय संचारते. उतारा करण्यासाठी ती कोंबडे, बकरे यांचा नैवेद्य मागते. त्यांच्याच माणसाकडून त्यांचे शोषण होताना दिसते. अज्ञान व अंधश्रध्देचा फायदा गंगुबाई घेताना दिसते. 'बलुतं', 'काट्यावरची पोटं', 'आभरान', 'ढोर', 'आठवणींचे पक्षी', 'तराळ-अंतराळ', इत्यादी आत्मकथनांमध्ये अस्पृश्यतेचा, जातीयतेच्या दाहक अनुभवांबरोबरच दलित स्त्रीच्या दास्यत्वाच्या परिस्थितीची तीव्र जाणीव होताना दिसते.

'अंत:स्फोट' हे कुमुद पावडे यांचे क्रमश: लेखांच्या रुपाने आकारास आलेले आत्मकथन आहे. यात लेखिकेने आपले मनोगत व्यक्त केले आहे. ती म्हणते "प्रज्ञा आणि करूणा यांचा योग्य मेळ माणसाच्या समावात बसून तो उन्नत होणे आवश्यक आहे. माणुस उन्नत असेल तर समाज उन्नत होईल. परंतु माणूसच भ्रष्ट, अत्याचारी हिंस्त्र वृत्तीने अन्यायी निम्न दर्जाचा असेल तर समाजाची घडणारी तशीच घडते. बुध्दधर्माचे उत्थान बुध्दीनं व्हावं, रुढीने नाही. अवडंबर माजवण्याची रुढी पुन्हा बुध्द धर्मात मूळ धरू लागली तर आज हिंदू धर्मात जे चालु आहे, तेच बुध्द धर्माचे होईल".[3] अर्थातच कुमुद पावडे यांनी सभोवतीच्या सामाजिक जीवनाचे चित्रण अंत:स्फोट मधुन स्वाभाविकपणे केले आहे. धर्मपरिवर्तनापूर्वी लेखिलेल्या आजोळी पारंपारिक हिंदुधर्माप्रमाणेच जीवनपध्दती होती असे दिसते. स्वत: लेखिकेचे आजोबा पांडवप्रताप, भागवतपुराण इ. ग्रंथाचे वाचन करताना दिसतात. लेखिकेला नंदेश्वर आजीसारखी पात्रे सामाजिक परिवर्तनाला खुणावतांना दिसतात. आजी म्हणते "बाबासाहेबांनी काय दिलं नाही? ह्यांना माणुसकी शिकवली. पण कॉलेज शिक्षण घेणारे देखील लोक माणुसकी विसरुन जातात. तेव्हा वाईट वाटते" (पृ-50) अशी सामाजिक परिवर्तनाला सामोरी जाणारी ही आजी आपल्याला दिसते. 'अंतस्फोट' मधील लेखाच्या संदर्भात डॉ. आरती कुळकर्णी म्हणतात, "लेखिकेने वास्तव दृष्टिकोनातून तसेच चिंतनशील विचारातून दलित जीवन व स्त्रीजीवन या प्रश्नांच्या दोन्ही बाजू विचारात घेऊन त्याला आत्मपरीक्षणाची जोड देऊन परिवर्तनाची दिशा दाखवून समाजाला विचार प्रवृत्त करण्याचा प्रयत्न केला आहे."[4] डॉ. कुळकर्णी यांच्या विधानावरून कुमुद पावडे यांनी आपल्या आत्मकथनात वाचकांचे सत्रीजीवनाच्या प्रश्नाकडे, लक्ष वेधलेले दिसते.

'मिटलेली कवाडे' मध्ये मुक्ता सर्वगौड यांनी समाजात जातीय विषमतेचे विदारक अनुभव कथन केले आहेत. समाजसेवेचे कार्य करतांना त्यांना आलेले अनुभव ते वास्तवपातळीवर मांडतात. शिक्षण घेतानाचा अनुभव त्यांनी सांगितला आहे. 'पुणतांब्याला असतांना घाणेरड्या गल्लीतून जाताना रोज शिव्यांचा प्रसादही त्यांना मिळायचा. चालली बघा. आगं निघाली? लहान हैस व्हय आता शाळा शिकाया? लगीन झालं आगं असतं तर दोन लेकरं झाली असती. काय लाज बीज?' (पृ.23) एकंदरीत शिक्षणाकडे उपेक्षेने पाहण्याचीच वृत्ती तेव्हा दिसुन येत होती. पुण्याला असताना खेड्याच्या तुलनेत शहरात जातीयतेची तीव्रता कमी झाल्याचे त्यांच्या लक्षात येते. समाजकार्य करताना लेखिकेला कोकणी-देशीवाद, कांबळे-गायकवाड, गट यांच्यातील विरोध यामुळे निरपेक्ष समाज कार्यात व्यत्यय येताना दिसतो. 'अक्करमाशी' या शरण कुमार लिंबाळे यांच्या आत्मकथनात स्त्रीजीवनाचे विदारक दर्शन घडते. यात स्त्रीजीवनाच्या हलाखीचे आणि अप्रतिष्ठेचे दर्शन घडते. संतामायला तिच्या नवऱ्याने नांदवले नाही. तिला एकच मुलगी मसामाय. तिला घेऊन हन्नूरात ती राहिली. चंद्रामाय ही संतामायची बहीण. तिचेही आयुष्य मुलेबाळे नसल्यामुळे उजाड झालेले होते. ही संतामाय पुढे मुसलमान दादाबरोबर राहते. मसामायचे आयुष्य तर वाऱ्यावरचेच वाटावे इतके अस्थिर असते. इठ्ठल कांबळेची पत्नी, दोन मुलांची आई असलेली ही स्त्री, हणमंतरावाच्या संशयावरुन पती व सासू गंगव्वा जातपंचायततीचा आसरा घेऊन तिला पतीता ठरवितात. नवरा सोडलेली मोकळीबाई. डोईवरचा पदर खांद्यावर पडलेला (पृ.30) अशा स्थितीत दादु गोंधळी कलगी तुऱ्यात गाणे म्हणायला तिला निमंत्रण देतो. पण ती नकार देते. आणि लोकांना न घाबरता हणमंता लिंबाळे बरोबर राहु लागते. पण मुल होणार हे कळताच हणमंत तिला सोडतो. पोटासाठी स्त्रियांना कसं जगावं लागतं याचे विदारक चित्र लिंबाळे यांनी स्त्री- प्रतिमेतून रेखाटले आहे. यात अक्करमाशीतील स्त्रीजीवन अनैतिकतेच्या खोल गर्तेत पडलेले दिसते. स्त्रीकडे एक भोग्य वस्तू म्हणून समाज पाहत असतो. अक्करमाशीतील स्त्री ही सुरक्षित दिसत नाही. एकतर भुकेपोटी ही स्वत:ला विकते किंवा वासनेच्या आहारी तरी ती गेलेली दिसते, असे वास्तपूर्ण चित्र लिंबाळे यांनी केले आहे.

'जिणं आमुचं' हे बेबी कांबळे यांचे आत्मकथन म्हणजे दलित स्त्रीच्या, दु:खाची कहाणी आहे. बेबी कांबळे यांनी स्वत:पेक्षा आपल्या समाजाच्या पूर्वायुष्याचे चित्रण 'जिणं आमुचं' मध्ये केलेले आहे. ते जिणे केवळ लेखिकेचे नसून लेखिकेसारख्या अनेक स्त्रियांचे आहे. 1940 वर्षापूर्वी दलित स्त्रीचे जीवन एकमेकींपासून पूर्णपणे वेगळे असे नव्हतेच. महार समाजातील स्त्री, तिचा अल्पवयातील विवाह तिच्यावर वरचष्मा ठेवण्यासाठी सतत प्रयत्नात असणारी सासू, तिने पळुन जाऊ नये म्हणुन तिच्या पायात खोडा टाकणारे व प्रसंगी तिचे नाक कापायला सिध्द असणारे सासू, सासरा, दीर, नवरा या सर्वांचे चित्रण लेखिकेने केले आहे. विवाहित स्त्रीवर कुटुंबातील सासू-सासरांचा केवढा दबाव व वचक असायचा या संदर्भात लेखिका म्हणतात. "ही लहानपणची सक्त मजुरी बरी! पण वयात आलं म्हंजे सुळावर चढल्यासारख वाटायचं सासुने दोघांची डोक्यात तेल घालुन राखणे करायची. मुलाची व सूनेची नरजभेट होऊ आयची नाही, दोघांना एकत्र येऊ आयचे नाही, एवढा कटाक्ष पाळला जात असे."[5] 'माझ्या जन्माची चित्तरकथा' या आत्मकथनातही शांताबाई कांबळे यांनी शिक्षण

**Akshardhara Research Journal**
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
**E ISSN -3048-8095 / Bimonthly / January- February 2025 / VOL -01 ISSUE-IV**

घेताना, नोकरी करताना त्यांना किती संघर्ष करावा लागला, अन्याय सहन करावा लागला याचे वेधक चित्र रेखाटले आहे. प्रस्तुत चरित्रात लेखिकेने आपल्याला शाळेत टाकल्यापासून ते 1981 साली शिक्षणाधिकारी म्हणुन निवृत्त होईपर्यंतच्या सतत विकसित होत जाणाऱ्या जीवनाचा ओळख चित्रित केलेला आहे. लेखिका म्हणुन त्यांची स्वत:ची स्त्री प्रतिमा वेगळी रेखाटली आहे. त्यांच्यावर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिकवणुकीचा व तत्वांचा प्रभाव पडला आहे. त्यांनी केवळ स्वत:चेच जीवन घडविले असे नाही तर आपल्या मुलांनाही त्यांनी हा शैक्षणिक वारसा दिल्याचे लक्षात येते. म्हणुन त्यांचे आत्मचरित्रातील एक धडाडीची, निर्भिड, कर्तबगार प्रतिमा वाचकांच्या लक्षात येण्यासारखी आहे.

नव्वदोत्तरी आत्मकथनांमधील स्त्रीप्रतिमा अशाच प्रभावी स्वरुपाच्या चितारलेल्या आहेत. शांताबाई कांबळे याचं 'कोल्हाट्याचं पोर', नजुबाई गावीत यांचं 'आदोर', उर्मिला पवार यांचं 'आयदान', नरेंद्र जाधव यांचं 'आमचा बाप अन आम्ही', उत्तम उत्तम कांबळे याचं 'वाट तुडवताना', 'आई समजून घेताना' या अलिकडच्या आत्मकथनांमधुन स्त्रीप्रतिमा वेगळ्या अंगाने चितारलेल्या दिसतात. बऱ्याचशा आत्मकथनांमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आणि तत्त्वांचा प्रभाव जाणवलेला दिसतो. नव्वदनंतरच्या जागतिकीकरणाचे चटके आणि परिणाम या माणसांना भोगावे लागलेले दिसतात. त्यात त्यांची मानसिक कोंडमारा झालेला दिसतो.

ग्रंथाली प्रकाशनाद्वारे प्रकाशित झालेले उर्मिला पवार यांचे 'आयदान' आत्मकथन स्त्रीजीवनाच्या जगण्याच्या दृष्टीने खूप प्रभावी ठरले आहे. उर्मिला पवार ज्या काळात जगल्या तो काळ स्त्रीजाणीव जागृतीचा आहे. त्यामुळे त्यांच्या लेखनाला एक विशाल परिमाण लाभलेले दिसते. घाटी – डोंगरातून, उन्हातान्हातून पळसाची पाणे पायाला बांधून धावणारी, आईच्या धाकाने शाळा गाठणारी विमल आणि पुढे जाण्याचा प्रयत्न करणारी उर्मिला असे लेखिकेचे दोन टप्प्यावरील जीवन चितारलेले दिसते. जातीने दलित त्यातही एक स्त्री म्हणजे दलितांहुन दलित असण्याचा अनुभव यात आविष्कृत झाला आहे.

आदिवासी कार्यकर्त्या नजुबाई गावीत यांचे 'आदोर' हे आत्मकथन भ्रमंतीच्या अनुभवातुन साकार झाले आहे. या संदर्भात डॉ. मनोहर जाधव म्हणतात, "नजुबाई गावीत या आदिवासी कार्यकर्तीने लिहिलेले 'आदोर' लक्षवेधी ठरले आहे. कॉ. शरद पाटलांच्या सत्यशोधक कम्युनिस्ट चळवळीत काम करतांना मिळालेली प्रेरणा या लेखनामागे आहे. आदिवासी जीवनातील भिन्नस्तरीय संघर्ष यात प्रामुख्याने आला आहे."[6] जाधव यांच्या निरीक्षणावरून 'आदोर' हे आत्मकथन किती प्रभावी आहे हे लक्षात येते.

उत्तम कांबळे लिखित आत्मकथनांमध्ये प्रतिकूल परिस्थितीत जीवन जगताना कौटुंबिक जीवन कसे तावून सुलाखून निघते याचा प्रत्यय त्यांची 'वाट तुडवताना' व 'आई समजून घेताना' ही आत्मकथने वाचल्यानंतर प्रकर्षाने जाणवते. 'आई समजून घेताना' आत्मकथनातील आई अर्थात 'अक्का' ची प्रतिमा खूप प्रभावी आहे. तिने आपल्या आयुष्यात मुलांसाठी, कुटुंबासाठी केलेले कष्ट शब्दातीत आहे. पाऊस पडत असतांना आपण पावसात जाऊ नये यासाठी प्रयत्न करणारी आई अर्थात अक्का आणि मुलाला घेण्यासाठी पावसात पाठवणारी उत्तम कांबळे यांची पत्नी या दोन स्त्रियांबद्दल वैचारिक मत तयार होताना दिसतात. कारण आई मुलाला पावसात जाण्यासाठी मज्जाव करते तर पत्नीला वाटते त्याने पावसात जावे. यामध्ये उत्तम कांबळे यांची कोंडी होताना दिसते. यात रक्ताची नाती समजून घेताना कोंडी होते. कुणाची बाजू घ्यावी हा प्रश्न उभा राहतो.

'वाट तुडवतांना' या आत्मकथनात 'सकाळ' चे संपादक होईपर्यंतचा (सन 1956 ते 1994) सुमारे अशा चार दशकांचा जीवनप्रवास उत्तम कांबळे यांनी मांडलेला आहे. या आत्मकथनातील व्यक्तिरेखेबद्दल डॉ. आषुतोष पाटील म्हणतात, "आत्मकथनातील सगळयात लक्षणीय. व्यक्तिरेखा ही उत्तमच्या आईची अर्थात अक्काची आहे. कष्टकरी, पीडित, दलित वर्गातील सर्व सामान्य स्त्रीचे प्रातिनिधिक जगणे म्हणून अक्काच्या जगण्याकडे पाहता येते."[7] पाटील यांच्या विधानावरून आक्का ची स्त्रीप्रतिमा किती महत्त्वपूर्ण व प्रभावी आहे हे लक्षात येते. एकूणच आत्मकथनांमध्ये लेखकांनी आपल्या आयुष्यात भेटलेल्या स्त्रियांच्या वेदना, दु:ख अन्याय, आत्याचार, दारिद्र्य, कष्ट अवमान अधोरेखित केले आहे. समाजातील जातीय विषमता, अंधश्रध्दा, स्पृश्य-अस्पृश्यता, उच-निच भाव कमी व्हावा यासाठी अशा शोधनिबंधाची गरज वाचकांच्या दृष्टीने – अभ्यासकांच्यादृष्टीने महत्त्वाची वाटते. नव्या पिढीमध्ये नवा दृष्टिकोन निर्माण व्हावा, स्वातंत्र, बंधुभाव, समता, न्याय या मानवी मूल्यांचे जतन व्हावे यासाठी नव्या पिढीत जाणीव-जागृती निर्माण होणे गरजेचे वाटते.

**निष्कर्ष :-**

1. दलित साहित्यातील 'आत्मकथन' हा प्रकार परिवर्तनाच्या लाटेतून उदयास आलेला दिसतो.
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेमुळेच दलित समाजाचे आत्मभान जागृत झालेले दिसते.
3. आत्मकथनांमधून दलित-उपेक्षित स्त्रियांच्या जीवनातील दु:ख, वेदना, कष्ट, अवमान, हेटाळणी, दास्यता अधोरेखित झाली आहे.
4. आत्मकथनातील सत्रीप्रतिमांच्या माध्यमातून नव्या – जुन्या पिढीतील संघर्ष अधोरेखित झाला आहे.
5. वेगवेगळ्या आत्मकथनात निरक्षर, सामान्य-असामान्य, शिक्षित स्त्रियांचे दर्शन घडते.

©Copyright 2024 *ADRJ*. All Rights Reserved 

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / Bimonthly / January- February 2025 / VOL -01 ISSUE-IV

6. आत्मकथनातील काही स्त्रिया धीर-गंभीर, संयमी, निर्भिड, तर काही स्त्रिया सामाजिक, कौटुंबिक दडपनाखाली वावरतांना दिसतात.
7. स्वकथनातील स्त्री व्यक्तिरेखा कुटुंबाला मार्गदर्शक व दिशा देणाऱ्या आदर्श स्त्रीप्रतिमा नजरेस आलेल्या दिसतात. (उदा. आई समजून घेताना – उत्तम कांबळे)
8. बहुतेक आत्मकथनातील स्त्रिया बिकट परिस्थितीलां खंबीरपणे सामोरे जाताना दिसतात.

**संदर्भग्रंथ :-**


1. डॉ. यशवंत मनोहर 'आंबेडकरवादी मराठी साहित्य', भीमात्र प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, 2006, पृ.276.
2. डॉ. आरती कुळकर्णी, 'दलित स्वकथने : साहित्यरुप', विजय प्रकाशन, नागपुर, प्रथमावृत्ती 1991, पृष्ठ. 19
3. कुमुद पावडे, 'अंत:स्फोट', आनंद प्रकाशन, औरंगाबाद, 1 मार्च 1981, पृ.10
4. डॉ. आरती कुळकर्णी, 'दलित स्वकथने : साहित्यरुप', विजय प्रकाशन, नागपुर, प्रथमावृत्ती 1991 पृ.69
5. बेबी कांबळे, 'जीणं आमुचं', रचना प्रकाशन, ठाणे, 1986, पृ.97.
6. डॉ. मनोहर जाधव, 'दलित स्त्रियांची आत्मकथने : स्वरुप आणि चिकित्सा', सुविधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती 26 जाने. 2001, पृ.259.
7. आशुतोष पाटील, 'वाट तुडवताना तील व्यक्तिदर्शन' लेखांतर्गत डॉ. शैलेश त्रिभूवन संपा. 'उत्तम कांबळे यांची आत्मकथने : चर्चा आणि चिकित्सा', डायमंड पब्लिकेशन, पुणे प्रथमावृत्ती 2010, पृ.70.